सत्यमेव जयते

**राष्ट्रीय आरोग्य अभियान**

**जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, वर्धा.**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सन २०२२-२३ करिता खालील प्रमाणे मंजुर व रिक्त पदांकरीता कंत्राटी पध्दतीने पदभरती करणे करिता अर्ज मागविण्यात येत आहे.**

## <u>पदाचे नाव</u>

**1) Implementation Engineer E-Sushrut (Facility Manager) 2) Psychologist 3) Optometrist 4) Psychiatrist 5) Clinical Psychologist 6) Early Interventionist cum Special educator 7) Physiotherapist 8) Rehabilitation Worker 9) Medical Social Worker 10) Dental Technician 11) Dental Hygienist 12) Dental Assistant 13) Audiologist cum Speech Therapist 14) Ayush Medical Officer 15) Ayush Medical Officer (UG) 16) Lab Technician 17) Technician - Radiographer & X-ray**

सदर पदांकरीता सविस्तर माहीती जाहीरात व अर्जाचा नमुना www.wardha.nic.in/ www.zpwardha.in या संकतेस्थळावर दि.18/8/2022 ला प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर पदांकरीता इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज व Demand Draft जाहीरातीमध्ये नमुद केल्या प्रमाणे आवश्यक कागदपत्रासह सादर करावेत. अर्ज स्विकारण्याची अंतीम दिनांक 30/08/ २०२२. संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत राहील.

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :- जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापन कक्ष, राआअ, आरोग्य विभाग, वर्धा**

**टिप :** सदर जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून जाहीरातीत नमूद केलेल्या तारखेपर्यंतच अर्ज स्विकारण्यात येतील. उशिरा आलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही तसेच अर्ज कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) स्विकारण्यात येतील याची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

10.8.2022

**सचिव**
**जि.ए.आ.व कु.क संस्था तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद, वर्धा**

**अध्यक्ष**
**जि.ए.आ.व कु.क संस्था तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, वर्धा**

# कंत्राटी पदांची पदभरती

# जाहीरात क्र.२ (सन २०२२-२३) राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा - वर्धा.

राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग,जिल्हा वर्धा अंतर्गत E-Sushrut , DEIC, RBSK,AYUSH, IPHS, NPHCE, NPPCD, NOHP, प्रकल्पाकरिता नव्याने मजुंर झालेली खालील पदे ११ महिने कालावधीकरिता रिक्त असलेल्या एकूण २३ पदांची पदभरती प्रकिया कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर राबविण्यात येत असुन ,खालील तक्तानुसार शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| Sr. No | Name of Post | Name of Programme | No. of Post | Qualification | Category | Place of Posting | Remuneration (Per Month Consolidated) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Implementation Engineer E-Sushrut (Facility Manager) | E-Sushrut | 2 | MCA/ B.Tech or Equivalent ( With 1 to 3 Year Experience in Relevant Field) | SC-1 Open -1 Total =2 | DH Wardha | 25,000/- |
| 2 | Psychologist | DEIC | 1 | MA Psychology | SC-1 Total=1 | MGIMS Sewagram, Wardha | 30,000/- |
| 3 | Optometrist | DEIC | 1 | Bachelor in Optometry from recognised University (With 1 Year Experience in Relevant Field) | Open-1 Total-=1 | MGIMS Sewagram, Wardha | 20,000/- |
| 4 | Psychiatrist | NMHP | 1 | MBBS with MD Psychiatrist/DPM/DNB (No Change) | Open-1 Total-=1 | DH Wardha | 75,000/- |
| 5 | Clinical Psychologist | NMHP | 1 | i) Having a recognised qualification in Clinical Psychology from an Institution approved and recognined by the Rehabilitation Council of India. Constituted under section 3 for the Rehibilition Council of India Act 1992. OR ii) having a post graduate degree in Psychology or Clinical Psychology or Applied Psychology and a Master of Philosophy in Clinical Psychology OR Medical and Social Psychology obtained after completion of a full time course of two years which | Open-1 Total-=1 | DH Wardha | 35,000/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | includes supervised clinical training from any University recognised by the University Grants Commission established under the University recognised by the University Grants and recognised by the Rehabilitation Council of India Act 1992 or such recognised | | | |
| 6 | Early Interventionist cum Special educator | DEIC | 1 | B.ED in Special Education in the field of Mental Retardation / B.ED. Special Education Locomotors and Neurological Disorder recognized by Rehabilitation Council of India<br>Experience – 2 year experience | Open-1<br>Total-=1 | MGIMS Sewagram, Wardha | 28,000/- |
| 7 | Physiotherapist | DEIC | 1 | 1 year certificate course/ Diploma in Multi Rehabilitation worker (DMRW) or Community based Rehabilitation worker (DCBR) from recognized institute registered at Rehabilitation personnel under Rehabilitation council Act 1992/ Physiotherapist | SC -1<br>Total= 1 | MGIMS Sewagram, Wardha | 20,000/- |
| 8 | Rehabilitation Worker | NPCDCS | 1 | 1 year certificate course/ Diploma in Multi Rehabilitation worker (DMRW) or Community based Rehabilitation worker (DCBR) from recognized institute registered at Rehabilitation personnel under Rehabilitation council Act 1992/ Physiotherapist | VJ A – 1<br>Total = 1 | RH Seloo | 20,000/- |
| 9 | Medical Social Worker | DEIC | 1 | MSW (Medical Specialization) | Open-1<br>Total=1 | MGIMS Sewagram, Wardha | 28,000/- |
| 10 | Dental Technician | DEIC - 1<br>NOHP - 1 | 2 | 12th Science and Diploma in Dental Technician Course. Registration with State Dental Council.<br>(With 2 Year Experience in Relevant Field) | SC-1<br>Open -1<br>Total= 2 | MGIMS Sewagram, Wardha<br>DH Wardha | 17,000/- |
| 11 | Dental Hygienist | NOHP | 1 | 12th Science and Diploma in Dental Hygienist Course. Registration with State Dental Council. | SC-1<br>Total=1 | DH Wardha | 17,000/ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (With 2 Year Experience in Relevant Field) | | | |
| 12 | Dental Assistant | NOHP | 1 | 12 th Pass with Dental clinic experience (1 year Experience) | Open-1 Total=1 | DH Wardha | 15500/ |
| 13 | Audiologist cum Speech Therapist | DEIC | 1 | Degree in Audiology (With 2 Year Experience in Relevant Field) | Open – 1 Total = 1 | MGIMS Sewagram, Wardha | 25,000/ |
| 14 | Ayush Medical Officer | RBSK Male Female | 4 | BAMS | ST – 3 SBC – 1 Total= 4 | RH Karanja – 1 Male RH Samudrapur Female-1 RH Seloo – Female 1 RH Ashti – Female -1 | 28,000/- |
| 15 | Ayush Medical Officer (UG) | AYUSH | 1 | UG Ayush | ST - 1 | DH Wardha - 1 | 28000/- |
| 16 | Lab Technician | DEIC IPHS | 2 | BSC - DMLT | ST – 1 NT C – 1 Total= 2 | RH Wadner -1 MGIMS Sewagram (DEIC) - 1 | 17,000/ |
| 17 | Technician - Radiographer & X-ray | IPHS | 1 | 10+2 in Science with diploma in relevant field (With 1 Year Experience ) | NT B - 1 | Requirement as per DH/SDH/RH | 17,000/ |
| **Total No of Post:-** | | | **23** | | | | |

**अटी व शर्ती :-**

१) इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज २) वयाचा पुरावा ३) पदवी/पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षाचे प्रमाणपत्र) ४) अंतीम वर्षाची गुणपत्रिका ५) शासकीय/निमशासकीय संस्थांमधील केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्रे कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरी तथा नाव व मोबाईल क्रमांकासह ६) अनुभव संबंधितच असावा ७) जात/वैधता प्रमाणपत्र इत्यादी छायांकित प्रतीसह दिनांक 18.08.2022 ते दिनांक 30.08.2022 रोजी सायंकाळी 5.30 वा. या कालावधीपर्यंत (शासकीय सुटी वगळुन) राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापन कक्ष, आरोग्य विभाग,वर्धा या पत्त्यावर पोस्टाव्दारे, कुरीअर अथवा प्रत्यक्षात सादर करण्यात यावे.

२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णय अनुसरुन अर्ज करण्याच्या अर्ज स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे वय १८ वर्षे पेक्षा कमी नसावे व कमाल वयोमर्यादा पेक्षा जास्त नसावे. (खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे) राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरीता ५वर्षापर्यंत वयोमर्यादा शिथिल करण्यात येईल. राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-याने अर्ज सादर केल्यास त्यांना कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरीचे कार्यरत असल्याबाबतचे पुरावा सादर करणे बंधनकारक राहील. अर्जदार हा शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

३) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्यामुळे जागा रिक्त झाल्यास प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नवीन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.

४) उपरोक्त पदांकरिता इच्छुक उमेदवाराने अर्जा सोबत **"District Integrated Health & family Welfare Society, Wardha".** या नावे देय असलेला खुल्या प्रवर्गासाठी रु.१५०/- व मागासवर्गीया साठी रु १००/- चा (ना परतावा) राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष जोडावा. तसेच धनाकर्षच्या मागे स्वतः चे नाव स्वःहस्ताक्षरात लिहावे.

५) जाहीरातीतील पदे ही राज्य शासनाची नियमीत ची पदे नसुन सदरील पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचे हक्क राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाहीत. तसेच अर्जदाराला शासकीय नियमीत सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

६) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती ११ महिन्यांकरिता असेल. व सदर पदांकरिता दरमहा एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

७) जाहीरातीत नमुद वय तसेच शैक्षणिक अर्हता, अनुभव व नोंदणी प्रमाणपत्र जाहीरात प्रसिध्द करण्याच्या दिनांकापर्यत ग्राहय धरली जाईल.

८) सविस्तर जाहीरात, पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, निवड/प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रियेबाबची सर्व माहीती/सुचना राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग वर्धा जिल्हयाच्या **www.wardha.nic.in and WWW.zpwardha.in** या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.

९) उपरोक्त पदांकरिता अनुभव हे पदांशी संबंधित असणे आवश्यक आहे. तसेच कुठल्याही अन्य अनुभवाला ग्राहय घरण्यात येणार नाही, व कामाचा अनुभव हा शासकीय/निमशासकीय/एनएचएम चा ग्राहय धरण्यात येईल. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१०) राखिव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेऊन व राष्ट्रीय आरोग्य अभियान कालमर्यादेत राबविण्याचे अभियान आहे ही बाब लक्षात घेऊन प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तसेच प्रतिक्षा यादीनुसार इतर प्रवर्गाच्या उमेदवारांना रिक्त पदाच्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती आदेश देण्यात येईल.

११) वरिल सर्व कंत्राटी पदे ही सन २०२१-२२ च्या मंजुर कृती आराखडयानुसार एकत्रित मानधनाची असुन ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यात येणार आहे. पुढील पुर्ननियुक्ती (११ महीन्याच्या कालावधीकरीता) आपल्या कामगिरी मुल्यांकनावर आधारीत असेल.

१२) केंद्र/ राज्य शासनाने संबधित पदे नामंजुर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल व याबाबत कुठलीही तक्रार व गाऱ्हाणी ऐकुण घेण्यात येणार नाही.

१३) निवड झालेल्या उमेदवाराना निवड यादीतील गुणानुक्रमांकाच्या आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. याबाबत उमेदवारांना कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१४) निवड झालेल्या उमेदवारांना कारारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- च्या बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

१५) निवड झालेल्या उमेदवाराना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये आंत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती आदेश देण्यात येईल.

१६) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच ते भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१७) राखीव संवर्गातुन अर्ज करण्याऱ्या उमेदवारांना त्या संवर्गाचे वैध प्रमाणपत्रे **(Cast/validity certificate)** जोडणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही. मागासवर्गीय उमेदवारांने अर्ज आरक्षणामधुन सादर केल्यास त्याबाबतचे कागद पत्र सोबत जोडण्यात यावे अन्यथा, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

१८) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशनचे नुतनीकरण प्रमाणपत्र/कौन्सिलचे रजिस्ट्रेशनासाठी अर्ज सादर केलेबाबतची पावती अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील तसेच कौन्सीलकडील नोंदणीबाबत अथवा ईतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालु कालावधीतील असावी. तथापी वैद्य प्रमाणपत्र उमेदवारांना भरतीप्रक्रीयेतुन अपात्र ठरविले जाईल.

१९) सदर पदांकरिता अर्ज करणारा उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.

२०) भरती प्रक्रियेदरम्यान ज्या ज्या उमेदवारांना बोलविण्यात येईल त्या त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरिता कोणतेही मानधन अथवा प्रवासखर्च उमेदवारांना देय राहणार नाही.

२१) अर्जाचा नमुना हा जाहीरातीसोबत प्रसिध्द करण्यात आलेला असुन, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

२२) उमेदवाराचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्याने नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

२३) लहान कुटुंबाची अट दिनांक २३.०७.२०२० पासुन लागु करण्यात आली असुन दिनांक २३.०७.२०२० पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाही.

२४) जाहीरातीमधील पदांच्या संख्येत तसेच सामाजिक आरक्षणामध्ये कमी-जास्त बदल व पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. अटी व शर्तीमध्ये बदल करणे. व पदभरती स्थगित करणे / रद्द करणे यांबाबतचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा, यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे.

२५) ज्या उमेदवारांना ग्रेड सिस्टीम / CGPA नुसार गुण मिळालेले आहेत त्यांनी अंतिम वर्षाच्या गुणांची टक्केवारी तसेच त्यांच्या विद्यापिठानुसार टक्केवारी काढण्याचे सुत्र अर्जामध्ये नमूद करावेत. सदर माहिती न दिल्यास गुण दिले जाणार नाहीत.

२६) सदर भरती प्रक्रियेमध्ये कोणतेही आक्षेप असल्यास यांचे निवारण करण्याचा अधिकार जिल्हा निवड समितीस राहील.

२७) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

२८) अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टक्केवारी अचूकपणे नमुद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमुद न करता गुणांची टक्केवारी नमुद करणे आवश्यक आहे. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडुन त्याचे गुणांमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणित करुन घ्यावे व त्याची स्वसाक्षांकित प्रत सादर करावी.

२९) उपरोक्त पदांकरिता निवड प्रकिया ही अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची छानननी करुन खालील प्रपत्रा प्रमाणे गुण देवून निवड करण्यात येईल. निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

| अ.क्र | विवरण | तपशिल | अधिकतम गुण |
|---|---|---|---|
| १ | पदासाठी आवश्यक Qualifying (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे. | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे ७० प्रमाणे proportion काढावे (उदा.६० गुण प्राप्त झाल्यास त्याचे ७० प्रमाणे Proportion = 60*70/100 = 42 | ६० गुण |
| २ | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अहर्ते पेक्षा अधिक शैक्षणिक अहर्ता असल्यास (संबधित विषयामध्ये अधिक शैक्षणिक अहर्ता असल्यास विचारात घेण्यात येईल. | उच्च शैक्षणिक अहर्ता हे संबधित पदाशी निगडित असल्यास अधिकतम १० गुण देण्यात येईल. | १० गुण |
| ३ | NHM मधील कामाचा अनुभव असल्यास (किमान अनुभव १ वर्ष) | प्रत्येक १ वर्षासाठी ४ गुण देण्यात येतील. फक्त शासकीय संस्था विभाग, शासन अंगीकृत संस्था व NHM मधील कामाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. | २० गुण |
| | | | एकुण १०० गुण |

३०) नियुक्ती आदेश देण्यापुर्वी अर्जा सोबत जोडलेल्या कागदपत्राची सर्व मुळ (Original) कागदपत्रे निवड समिती मार्फत पडताळणी करुन सादर करण्यात आलेली कागदपत्रे चुकीची आढळल्यास उमेदवारांना निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

10/8/2021

सचिव
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,वर्धा

अध्यक्ष
जि.ए.आ.व कु.क.सोसायटी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,वर्धा

| Application No. : (Office Use only) | |
|---|---|

**NATIONAL HEALTH MISSION, DISTRICT WARDHA**

Year 2022-23 (Advertisement No.1 /2022 Publish Date 0 /0 /2022)

# Application Form

STICK RECENT PHOTO HERE

**Applying Post Name :-**____________________________________

(All fields in the forms are mandatory to be filled an Incomplete form submitted will be treated as rejected)

| **Name:** | | |
|---|---|---|
| **Father's/Husband's Name:** | | |
| Date of Birth: DD / MM / YYYY | Blood Group: | Gender:<br>Marital status : |
| Age : | Existing NHM Employee (Yes/ No) | Nationality: |
| Original Category : | Applying Category : | Caste Certificate Attached : **Yes/No** |

**Address/Contact Details: (Name of the District and Pin code is compulsory)**

| Address:<br>State<br>Pin:<br>Contact No: | |
|---|---|
| E-Mail Id Correspondence: | |

Academic /Professional Educational all summary: (Starting form most recent)

| **From (MM/YY)** | **TO (MM/YY)** | **Degree/ Diploma** | **University/ Institute** | **Specialization/ Subjects** | **Final Year Total Marks & Obtained Marks** | **Final Year Percentage ( %)** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**(OFFICE USE ONLY)**

**Remark :-**

**Name of Authority:-**____________________ **Signature of Authority:-**____________________

**Work/Experience Summary :( Starting for**

| Sr. No | Form (MM/YY) | To (MM/YY | Organization | Designation | Responsibilities (Min.30 & Max.50 Words) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| | |
|---|---|
| **Total Experience** (In Years & Months): | Relevant Experience to the post applied<br>(In Years & Months): |
| **Computer Proficiency**: | |
| **Typing Skill :** Marathi Typing 30 wpm (Yes/No) : | |
| English Typing 40 wpm (Yes/No) : | |
| **Demand Draft No.:** **Date:-** / / **Bank Name :** | |

**mcurrent/most recent)Experience :**

**Declaration:**

I hereby declare that all statements made in the application are true, Complete and correct to the best of my knowledge and belief. I understand that in the event of any information being found untrue/false/incorrect or I do satisfy the eligibility criteria my candidature will be cancelled, without assigning any reason thereof. I have read the content of the advertisement and agree to abide by the rules, regulations and procedures for appointment to the post applied for.

Name:

Place:

Date :

**Signature**

# Disclaimer:

The applicants are required to submit the full filled application on the day of walk in Interview

**<u>Checklist for documents to be submitted :</u>**

1) Full filled Application form in the prescribed format.
2) For age Proof – School Leaving Certificate/ 10th Passing Certificate / Domicile Certificate
3) Diploma, Degree & Master Degree
4) If any post-graduation, Post-graduation certificate
5) Experience – Experience certificate as per mention in the form
6) Computer Proficiency - MS-CIT/ DOEACC Course- for the Post if applicable.
7) Typing Course

# प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो/करते की, आपले कार्यालयाकरीता.......................... ची पदे भरणेसंबंधी जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असुन सदर जाहीरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत, तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी आहे. वर नमुद केलेली माहिती चुकीची व खोटी आढळुन आल्यास माझी या पदांकरीता उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशिर कार्यवाहीस पात्र राहील याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती अधिकाऱ्यांचा निर्णय मला बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ**

## प्रतिज्ञापत्र

### नमुना अ (नियम ४ पहा)

मी श्री/श्रीमती ..........................................................

श्री ........................................................ यांचा/ यांची मुलगा:मुलगी/ पत्नी वय........

.

वर्ष, राहणर, .................................................... याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१) मी .......................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ...... (सख्या) ईतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ....... आहे (असल्यास जन्मदिनांक नमुद करावी)....... .....

३) दिनांक २८ मार्च २००५ रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-...................

दिंनांक :-................

**अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**

**अविवाहीत उमेदवारांनी नमूना अ प्रतिज्ञापत्र लागु नाही असे नमुद करुनस्वाक्षरी करणे आवश्यक आहे. नाव व स्वाक्ष्री नसल्यास अर्ज अपुर्ण आहे असे समजून रद्द ठरविण्यात येईल.**